आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता
१७ मार्च २०२६ - मंगळवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांमध्ये सदस्य नामनिर्देशित करण्याची तरतूद असलेलं विधेयक राज्य विधानसभेत मंजूर

- पीक वीमा योजनेत सुधारणा केल्याची केंद्र सरकारची संसदेत माहिती

- लोकसभेत गदारोळ करणाऱ्या ८ विरोधी खासदारांचं निलंबन मागे

- पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीसाठी तृणमूल काँग्रेसची, तर केरळमसाठी काँग्रेसची उमेदवार यादी जाहीर

**आणि**

- इराणचे प्रमुख सुरक्षा अधिकारी आणि निमलष्करी दलाच्या प्रमुखाला ठार केल्याचा इस्त्राइलचा दावा

**<><><><><>**

विधानसभेनं आज जिल्हा परिषद आणि पंचायत समित्या दुरुस्ती विधेयकासह ५ विधेयकं मंजूर केली. जिल्हा परिषदेत एकूण सदस्य संख्येच्या दहा टक्के, किंवा पाच सदस्यांना नामनिर्देशित करण्याची, तसंच पंचायत समित्यांमध्ये एकूण सदस्य संख्येच्या वीस टक्के, किंवा किंवा एका सदस्याला नामनिर्देशित करण्याची तरतूद महाराष्ट्र जिल्हा परिषद आणि पंचायत समित्या दुसरी सुधारणा विधेयक २०२६ मधे आहे. ते एकमतानं मंजूर झालं. ग्रामविकासाकरता काम करणारे सामाजिक कार्यकर्ते, तज्ञ यांना जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांमध्ये प्रतिनिधित्व मिळावं हा याचा हेतू असल्याचं सरकारनं सांगितलं. या सदस्यांना मताधिकार नसेल असं मंत्री जयकुमार गोरे यांनी स्पष्ट केलं.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ दुसरी सुधारणा विधेयकही एकमतानं मंजूर झालं. कुलगुरूंच्या शिफारशीवरून प्र कुलगुरुला पदावरून हटवणं, अधिष्ठात्याचं पद रिक्त झालं तर सहा महिन्यांच्या कालावधीसाठी नियुक्ती करणं आदी तरतुदी यात आहेत.

कालबाह्य झालेले ८० कायदे रद्द करणारं महाराष्ट्र निरसन विधेयक २०२६ ही एकमतानं मंजूर झालं. महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा सुधारणा विधेयक २०२६

बहुमतानं मंजूर झालं. महाराष्ट्र मोटार वाहन कर सुधारणा विधेयकही विधानसभेत मंजूर झालं.

**<><><><><>**

महाराष्ट्र धर्मस्वातंत्र्य विधेयक, २०२६ आज गृहराज्यमंत्री पंकज भोयर यांनी विधानपरिषदेत मांडलं. सध्या या विधेयकावर सभागृहात चर्चा सुरू आहे. विविध ठिकाणी काम करणाऱ्या धार्मिक संस्था, मोफत शिक्षण देणाऱ्या संस्थांनाही हा कायदा लागू होणार का, हे स्पष्ट होणं गरजेचं आहे, असं मत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांनी मांडलं. जबरदस्तीनं धर्मांतर थांबवण्यासाठी कायदा आणला, तसंच सलोख्यासाठी कायदा आणणं आवश्यक असल्याचं ते म्हणाले.

राज्य घटनेनं दिलेला धर्मस्वातंत्र्याचा अधिकार स्वेच्छेनं, दबावाला बळी न पडता धर्मांतर करण्यासाठी आहे. हे स्वातंत्र्य टिकवणं आणि त्याचा गैरवापर थांबवण्यासाठी सरकारनं हे विधेयक आणलं आहे, असं भाजपाचे प्रवीण दरेकर म्हणाले.

**<><><><><>**

देशभरात पेट्रोल आणि डीझेल पुरशा प्रमाणात उपलब्ध असल्याची माहिती पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयाच्या संयुक्त सचिव सुजाता शर्मा यांनी नवी दिल्लीत दिली. गेल्या काही दिवसात देशभरात सिलिंडरची साठेबाजी रोखण्यासाठी झालेल्या कारवाईविषयी त्यांनी माहिती दिली..

**- - - होल्ड..बाईट सुजाता शर्मा - - -**

पाईपलाईन टाकण्यासाठी प्रलंबित असलेल्या अर्जांना मान्यता मिळाली आहे असं ग्राह्य मानलं जावं आणि नवीन अर्जांना २४ तासांत मंजुरी दिली जावी, असं सर्व राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांना सरकारने पत्राद्वारे कळवल्याचं त्या म्हणाल्या.

आखाती प्रदेशातली सर्व भारतीय जहाजं आणि त्यावरचे खलाशी सुरक्षित असल्याची माहिती बंदरे आणि जलमार्ग मंत्रालयाचे विशेष सचिव राजेश कुमार सिन्हा यांनी यावेळी दिली. गेल्या २४ तासात १६१ खलाशांना भारतात परत आणण्यात आल्याचंही सिन्हा म्हणाले.

**<><><><><>**

शेतकऱ्यांसाठीच्या प्रधानमंत्री पीक विमा योजनेत केंद्र सरकारने सुधारणा केली असल्याची माहिती केंद्रीय कृषीमंत्री शिवराजसिंह चौहान यांनी आज लोकसभेत एका प्रश्नाच्या

उत्तरात दिली. विम्याचे दावे २१ दिवसात निकाली काढणं बंधनकारक असून त्यात उशीर झाला, तर कंपनीला १२ टक्के दराने व्याज द्यावं लागेल, असं त्यांनी स्पष्ट केलं….

**होल्ड- बाईट- चौहान**

शेतकऱ्यांना हमीभाव यंदा वाढवून दिले असून हमीभावाने खरेदी अजूनही सुरु असल्याचं त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

लोकसभेत गदारोळ करणाऱ्या ८ विरोधी खासदारांचं निलंबन मागे घेण्यात आलं. भंडारा गोंदियाचे काँग्रेस खासदार प्रशांत पडोळे यांच्यासह ८ जणांना गैरवर्तन केल्याबद्दल अधिवेशन संपेपर्यंत सभागृहातून निलंबित केलं होतं. हे निलंबन तात्काळ मागे घ्यावं, असा ठराव संसदीय कार्यमंत्री किरेन रिजिजू यांनी मांडला आणि तो एकमताने संमत झाला.

**<><><><><>**

कर्मचारी निवृत्तीवेतन योजने अंतर्गत मधे येणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी किमान सेवानिवृत्तीवेतनात वाढ करावी अशी शिफारस त्यासंदर्भात नेमलेल्या संसदीय समितीने केली आहे. सध्या देय असलेलं महिना हजार रुपये निवृतीवेतन जीवनमानावरचा किमान खर्च भागवण्यासाठी पुरेसं नाही**,** ते तातडीने वाढवावं असं समितीने अहवालात म्हटलं आहे.

कंत्राटी कर्माचाऱ्यांना कर्मचारी राज्य विमा आणि भविष्य निर्वाह निधी या सुविधांचा लाभ द्यावा असंही समितीने सांगितलं आहे. त्यांना भरपाई वेळेवर आणि पुरेशी मिळते की नाही यावर देखरेख ठेवण्यासाठी केंद्र आणि राज्य सरकारांनी मिळून विशेष यंत्रणा उभारावी असं सांगितलं आहे.

**<><><><><>**

केंद्र सरकारनं सादर केलेल्या २ लाख १ हजार कोटी रुपयांच्या पुरवणी मागण्यांना आज संसदेची मंजुरी मिळाली. देशात पुरेशा प्रमाणात एलपीजी उपलब्ध आहे. पुरवठा नियमित रहावा यासाठी सरकार प्रयत्नशील असल्याची माहिती केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी यावरच्या चर्चेला उत्तर देताना राज्यसभेत दिली.

**<><><><><>**

पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीसाठी तृणमूल काँग्रेसनं २९४ पैकी २९१ मतदारसंघांमधल्या उमेदवारांची नावं आज जाहीर केली. तृणमूलनं दार्जिलिंगमधल्या तीन जागा भारतीय गोरखा प्रजातांत्रिक मोर्चा या मित्रपक्षासाठी सोडल्या आहेत.

पक्षाध्यक्ष ममता बॅनर्जी पुन्हा एकदा भवानीपूरमधून निवडणूक लढवणार आहेत. तिथं भाजपानं विरोधी पक्षनेते सुभेंदू अधिकारी यांना उमेदवारी दिली आहे. आजच्या उमेदवारयादीत तृणमूल काँग्रेसनं ७४ विद्यमान आमदारांना वगळलं आहे. १३५ विद्यमान आमदारांकडे त्यांचे सध्याचे मतदारसंघ कायम ठेवले आहेत, तर १५ जणांचे मतदारसंघ बदलले आहेत.

पश्चिम बंगालमधे इतर राजकीय पक्ष आणि आघाड्यांनी अंशतः याद्या जाहीर केल्या आहेत. प्रमुख राजकीय पक्षांपैकी काँग्रेसची उमेदवार यादी अद्याप जाहीर व्हायची आहे.

<><><><>

केरळम विधानसभा निवडणुकीसाठी काँग्रेसनं पहिली उमेदवार यादी जाहीर केली आहे. ५५ उमेदवारांच्या या यादीत विरोधी पक्षनेते व्ही. डी. सतीशन, केरळम प्रदेश काँग्रेसचे माजी अध्यक्ष रमेश चेन्नीथला, के. मुरलीधरन यांसारख्या प्रमुख नेत्यांचा समावेश आहे. उमेदवार यादी जाहीर करतानाच काँग्रेसनं राज्यात प्रचाराच्या तयारीला सुरुवात केली आहे.

सत्ताधारी डाव्या लोकशाही आघाडीनं, तसंच भाजपाप्रणित राष्ट्रीय लोकशाही आघाडीनं कालच आपल्या पहिल्या उमेदवार याद्या जाहीर केल्या आहेत. त्यामुळे केरळममधे निवडणुकीची रणधुमाळी सुरु झाली आहे.

<><><><>

इराणचे प्रमुख सुरक्षा अधिकारी अली लारिजानी यांचा हवाई हल्ल्यात मृत्यू झाल्याचा दावा इस्त्राएलचे संरक्षण मंत्री इस्त्राएल कात्झ यांनी केला आहे. अली लारिजानी इराणच्या सुप्रीम नॅशनल सिक्युरिटी कौन्सिलचे महत्त्वाचे अधिकारी आणि इराणचे दिवंगत सर्वोच्च नेते अयातुल्लाह खामेनी यांचे जवळचे सल्लागार मानले जातात. लारिजानी१२ वर्षं इराणच्या संसदेचे सभापती होते. मध्य तेहरानवर केलेल्या हल्ल्यात बासिज या इराणी निमलष्करी दलाचे प्रमुख गुलामरझा सोलिमनी यांचाही मृत्यू झाल्याचा दावा इस्त्राएलने केला आहे. मात्र इराणनं सोलिमानी यांच्या मृत्यूची पुष्टी केलेली नाही.

<><><><>

टपाल खात्यानं २४ तासात किंवा ४८ तासात पत्र आणि वस्तू पोहोचवण्याची सुविधा सुरू केली आहे. दिल्ली, मुंबई, चेन्नई, कोलकाता, बेंगळुरू आणि हैदराबादमध्ये आजपासून या सेवेला सुरुवात झाली. केंद्रीय मंत्री ज्योतिरादित्य शिंदे यांच्या हस्ते आज नवी दिल्लीत या सेवेचं उद्घाटन झालं. यात पत्र किंवा वस्तू मिळाल्याची खात्री ओटीपीद्वारे केली जाणार आहे. या गोष्टी पोहोचवण्यात उशीर झाला तर पैसे परत देण्याची सुविधाही टपाल खात्यानं उपलब्ध करुन दिली आहे.

**<><><><><>**

स्थानबद्धता रद्द होणं ही दोन्ही बाजूंसाठी फायदेशीर गोष्ट  असल्याचं सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचुक यांनी म्हटलं आहे. कारागृहातून सुटका झाल्यानंतर ते आज प्रथमच पत्रकार परिषदेला संबोधित करत होते. लडाखच्या जनतेशी संवाद साधण्यासाठी केंद्र सरकारनं हात पुढे केल्याचंही ते म्हणाले. आपण लडाखला जाऊन 'लेह ॲपेक्स बॉडी' आणि 'कारगिल डेमोक्रॅटिक अलायन्स' यांच्या नेत्यांशी चर्चा करू, असंही वांगचुक यावेळी म्हणाले.

**<><><><><>**

तीन महिन्यांपेक्षा लहान वयाचं मुल दत्तक घेतलं तरच त्या  महिलेला मातृत्व रजा मिळेल, हा नियम भेदभावपूर्ण असल्याचं ठरवत सर्वोच्च न्यायालयानं तो आज रद्द केला. मुल दत्तक घेणं हे प्रजनन स्वायत्ततेच्या अधिकाराचा भाग असल्याचं निरीक्षण सर्वोच्च न्यायालयानं यावेळी नोंदवलं.

**<><><><><>**

महाराष्ट्र एकीकरण समितीचे अध्यक्ष दीपक दळवी यांचं आज बेळगावमध्ये निधन झालं. गेल्या काही दिवसांपासून ते आजारी होते.

**//<><><><><>//**